St. G. G. College
Inward No. 2331
Date : 10/02/2022

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
सहायक आयुक्त, समाज कल्याण, पालघर
आफरिन अपार्टमेंट बी विंग, पहिला मजला रुम नंबर-१०६ रेल्वे फाटकाजवळ, नवली पालघर (पू)
Email :- acswopalghar@gmail.com
दूरध्वनी क्र.०२५२५-२५४२७७.

जा.क्र.सआसक/पालघर/भासशि/महाडिबीटी/२०२१-२२/९३

दिनांक :-०९/०२/२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व महाविद्यालये,
जि.पालघर

**विषय :- सन २०००२१-२२ करिता अनुसूचित जाती,विजाभज,इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती,शिक्षण फी व परिक्षा फी प्रदाने योजनेची डी.बी.टी.पोर्टलद्वारे अमलबजावणी करणेबाबत.**

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता अनुसूचित जाती, विजाभज,इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती
२) राज्य शासकीय शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रिशीप) योजना
३) राजर्षि शाहू महाराज मॅट्रीकोत्तर गुणवत्ता शिष्यवृत्ती

या योजनांचे महाडिबीटी पोर्टल चा वापर करुन अर्ज निकाली काढण्याकरिता दि.१४ डिसेंबर, २०२१ पासून पोर्टल सुरु करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे आपणास चालू शैक्षणिक वर्षाकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार अनुसूचचित जाती प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा फी, या योजनेची अदायगी प्रक्रीया पूर्ण होणेबाबत दि.१५ फेब्रुवारी, २०२२ व विजाभज,इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दि.२८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे. डिबीटी डॅशबोर्ड वरुन तपासले असता अतिशय कमी प्रमाणात विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेतलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे.

तसेच आपल्या या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांमध्ये व त्यांचे पालकांमध्ये रोष निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाने सूचित केल्याप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त होणारे केंद्रीय अनुदान चालू आर्थिक वर्षात खर्ची न पडल्यास उर्वरीत रक्कम पुढील आर्थिक वर्षात पुनर्विनियोजित करुन वापरल्यास राज्य शासनास सक्त मनाई केलेली आहे.

तेव्हा आपल्या महाविद्यालयातील अनुसूचित जाती,विजाभज,इमाव व विमाप्र या प्रवर्गातील १००% विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घ्यावेत. तसेच भरलेले सर्व अर्ज तपासून दोन दिवसात या कार्यालयास सादर करण्यात यावे, पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ विहित वेळेत न मिळाल्यास व केंद्र शासनाचे अनुदान अखर्चित राहून व्यपगत झाल्यास तसेच मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचीत राहिल्यास याची सर्व जबाबदारी आपली राहिल याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

(डॉ.माणिक गुरसळ)
जिल्हाधिकारी,पालघर

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.आयुक्त,समाज कल्याण,आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे
२) प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,मुंबई विभाग,मुंबई